# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 09/02/2018 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावर राजकमल हॉटेल येथे दिनांक 08/02/2018 चे 14.40 वाजता दरम्यान अज्ञात आरोपीने हॉटेलच्या बाथरूमच्या छताचे सिमेंट सिट तोडुन आत मध्ये प्रवेश करून सिसीटीव्ही चे मॉनीटर, माऊस किं. 2,000/–रू. कॅशमशीन मधील अंदाजे 6,000/– रू. व काऊंटर मध्ये ठेवलेले 40,000/– रू. असा एकुण 48,000/– रू. मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. निवृत्ती यावले हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर एनएच–6, काठीयावाड ढाबा येथे दिनांक 08/02/2018 चे 16.00 वाजता फिर्यादी नामे– चंद्रपाल बादशाह खान, वय 37 वर्ष, रा. चौसिंधी जि. आगरा उ. प्र. हा आपला कंटेनर क्र. जीजे–01/इटी– 2745 मध्ये कुरीयर चे सामान घेवुन जात असतांना अज्ञात आरोपीने 12 नग बंडल व बॉक्स किं. 2,63,806 /–रू. चा मुद्देमाल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. भांबुरकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर